|| अल्पारंभ: क्षेमकर:||

SWS Financial Solutions Pvt. Ltd.

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

गवाक्ष

……एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक: ARN- ९०७४६

अंक ५२: एकतिसावा वर्धापनदिन विशेषांक

श्री. दिपक कुलकर्णी,
व्यवस्थापकीय संचालक.

प्रिय गुंतवणूकदार, हितचिंतक आणि संपूर्ण SWS टीम.. संस्थेच्या ३१ व्या वर्धापनदिनानिमित्त हा लेख लिहितांना मला निरतिशय आनंद होतो आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीच्या वेगात आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगातही, आमच्या व्यावसायिक प्रवासात आपण सर्वांनी संस्थेवर दाखवलेला **अतूट विश्वास** !!

आज AI च्या साह्याने अगदी काही सेकंदांतच, इतर माहितीप्रमाणेच विमा आणि गुंतवणूकीच्या संदर्भातही हवी असलेली माहिती, आकड्यांचे विश्लेषण, गुंतवणूक आणि विमा पर्यायांची तुलना इ. डेटा आपण सहजपणे मिळवू शकतो. याशिवाय गेल्या काही वर्षांच्या कालावधीत आपण अनेक ऑनलाईन गुंतवणूक प्लॅटफॉर्म्स आणि या संदर्भातील मोबाईल ॲप्लिकेशन्सचा उदय झालेला पाहत आहोत. असे असतांनाही, **आपल्या सर्वांच्या विश्वासाच्या आणि सहकार्याच्या भक्कम आधारवर संस्थेची व्यावसायिक घोडदौड सुरु आहे. गेल्या वर्षीच संस्थेने रु. १००० कोटींच्या मालमत्ता व्यवस्थापनाचा टप्पा गाठलेला आहे.**

हे यश मला हेच दर्शविते आहे की जवळच्या, विश्वासाच्या व्यक्तीची जागा आणि त्याद्वारे मिळणाऱ्या **मानसिक आधाराची आणि मनः शांतीची** जागा तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी घेऊ शकत नाही. SWS टीममधील प्रत्येक जण, तुमच्याशी व्यावसायिक देवाणघेवाणीच्या पलीकडे जाऊन वैयक्तिक ऋणानुबंधांनेही बांधला गेलेला आहे. आणि आपल्यातील या सौदार्हयामुळेच संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावतो आहे.

याची अधिक कारणमीमांसा करताना मला पुढील मुद्दे प्रकर्षाने जाणवतात.

- **वैयक्तिक आर्थिक सल्लागार : तुमचा सहृदयी मित्र:** डिजिटल युगात अनेकविध माध्यमांतून माहितीचा मारा आपल्यावर होत आहे. हातासरशी (की बोटांसरशी ?) हवी ती माहिती उपलब्ध होत असतांनादेखील बहुतांश ग्राहक आमच्याशी फोनवर किंवा प्रत्यक्ष भेटीत झालेल्या चर्चांमधूनच आपले आर्थिक निर्णय घेतांना दिसत आहेत. म्हणजेच संपत्तीसारख्या महत्वाच्या बाबतीत 'यांत्रिक कृत्रिम सेवांपेक्षा', आपल्या ओळखीच्या, विश्वासाच्या आणि यथोचित ज्ञान संपादित केलेल्या सल्लागारावरच ग्राहकांची भिस्त आहे. कारण SWS टीम मधील एक तरी व्यकती **तुमच्या कौटुंबिक आणि भावनिक विश्वाला समजावून घेणारा एक कौटुंबिक,सहृदय मित्रच बनलेला आहे.**

- **व्यावसायिक कौशयल्यांचे अद्यतन :** SWS मध्ये **'Market Research & Strategy Team'** हे नवीन डिपार्टमेंट कार्यरत झाले आहे. बदलत्या मार्केट परिस्थितीचा, गुंतवणूक क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणारी आणि FinTech क्षेत्रांतील टूल्सचा वापर करून ग्राहकांच्या पोर्टफिलिओचे अचूक पुनरावलोकन करणारी टीम आता इथे कार्यरत झालेली आहे. त्यामुळे पोर्टफोलिओमध्ये आवश्यक असणारे बदल, त्याची नवीन संरचना कशी असावी याबाबतच्या शिफारशी आणि त्यानुसार लगोलग पुरविल्या जाणाऱ्या सेवा आमच्या ग्राहकांना भावत आहेत. 'उत्तम, तत्पर, अचूक व्यावसायिक सेवा' हे संस्थेच्या प्रगतीचे जुने पण नवीन स्वरूपातील मापदंड ग्राहकांना भावत आहेत.

- **सामाजिक भावनेची जोपासना:** कुठल्याही संस्था किंवा व्यक्तीचे खरे स्वरूप, दैनंदिन व्यवहारांच्या पलीकडे गेल्यावरच लक्षात येते. म्हणजे कुठलाही आर्थिक / वैयक्तिक फायदा नसतांना पत्करलेले आचरण किंवा दिलेल्या सेवा, केलेली मदत, सहकार्याचा पुढे केलेला हात, सामाजिक प्रश्नांबाबत दाखवलेली संवेदनशीलता अशांसारख्या बाबी संस्थेची मूल्ये, संस्कृती यांचे दर्शक असतात. बहुसंख्य ग्राहकांना याची कल्पना आहे की अल्पारंभ फाऊंडेशनच्या माध्यमातून टीम SWS नेहेमीच विविध गरजू शैक्षणिक संस्था, विशेष अथवा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या संस्था, भारतीय संस्कृतीचा प्रचार करणाऱ्या संस्था यांना मदतीचा हात देण्यासोबतच आपल्या संस्कृतीस आणि पर्यावरणास भेडसावणाऱ्या प्रश्नांवर कार्यरत असते. स्व. रतन टाटा याबाबत आमचे आदर्श आहेत. टाटांइतका मोठा नसला तरी आमचा खारीचा वाटा आम्ही उचलत आहोत. मला असे वाटते की एक संस्था म्हणून **'सर्वंकष आणि सर्वसमावेषक प्रगती'** ची आस आम्हाला नेहेमीच असते. आणि या प्रवासात माणसांना आणि मनांना जोडणारा, संपूच नये असा एक सेतू आपोआप तयार होत आहे.

या विस्तारलेल्या या डिजिटल, यांत्रिक युगात, प्रामुख्याने वरील कारणे संस्थेच्या प्रगतीस कारणीभूत ठरली आहेत आणि भविष्यातही ठरणार आहेत. तेव्हा या वर्धापनदिनी मी ही आशा करतो की या मूल्यांच्या जोरावर आपले नाते अधिक दृढ आणि समृद्ध होवो, तुमच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोतच. संस्थेचा प्रवास यशदायी करण्यात सिंहाचा वाटा असणाऱ्या तुम्हा सर्व ग्राहकांचे मनःपूर्वक आभार !

Behavioral Finance Quotes

Long Term Patience: The Key To Long Term Wealth Creation. Save Your Long Term Wealth from The Short Term Emotions.

आर्थिक निर्णय घेतांना भावना जरा बाजूला ठेवा !!

श्री. रघुवीर अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी

मी गेली एकतीस वर्षे वित्तीय सेवा क्षेत्रात काम करत आहे. या कालावधीत मी अनेक आर्थिक चक्रे पाहिली जसे की तेजी, मंदी, घसरण, उत्साह, भीती, धोरणात्मक बदल आणि कोरोनासारखे अनपेक्षित धक्के. पण या सर्वांमध्ये एक गोष्ट कायम राहिली — मानवी भावना, त्यापायी घेतले जाणारे निर्णय आणि त्यांचा आर्थिक नियोजनावर होणारा परिणाम. या दीर्घ प्रवासात मला एक गोष्ट वारंवार अनुभवायला मिळाली आहे — आर्थिक निर्णय हे नेहमी तर्कशुद्ध असतातच असे नाही. अनेकदा हे निर्णय मनातील विविध भावना जसे राग, नाराजी, अहंकार, भिती किंवा अपूर्ण माहिती यांच्या प्रभावाखाली घेतले जातात. Behavioral Finance ही शाखा नेमकी याच मानवी मानसिकतेचा अभ्यास करते. माझा अनुभव सांगतो की चुकीच्या आर्थिक निर्णयांचे मूळ बहुतांश वेळा बाजारातील चढउतार किंवा तेथील घडामोडी यात नसून निर्णय घेतानाआपल्या भावना, मार्केट बाबतच्या आपल्या प्रतिक्रिया किंवा घाईच्या निर्णयांमध्ये असते.

भीतीपोटी घेतलेले निर्णय, अधिक परताव्याच्या लोभापायी उचललेली पावले, स्वतःचे नियोजन सोडून इतरांच्या अनुभवावर आधारित आर्थिक अनुकरण करणे यामुळे संपत्ती निर्माण करण्याचा प्रवास भरकटतो आणि माणुस आपल्या आर्थिक ध्येयांपासून दूर जातो.

संपत्ती निर्माण (Wealth Creation) : आर्थिक गणितांपेक्षा मानसिक शिस्तीचे पालन करण्यात आर्थिक यशाचे गमक दडलेले आहे.

संपत्ती निर्माण म्हणजे केवळ गुंतवणूकींचे योग्य पर्याय निवडणे नसते. हा एक मानसिक प्रवास सुद्धा आहे. या प्रवासात संयम, सातत्य आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवणे अत्यावश्यक असते. बाजारातील चढ-उतार, बातम्यांचा गोंगाट, माहितीचा मारा किंवा इतरांच्या मतांचा प्रभाव यामुळे मनात अनेकदा संभ्रम निर्माण होतात. परंतु **योग्य वेळी, विचारपूर्वक घेतलेलया निर्णयांचे पालन हीच खरी गुंतवणुकीतील शिस्त आहे जी तुम्हाला तुमचे आर्थिक ध्येय गाठण्यास मदत करत असते.** आर्थिक नियोजन तयार करणे, त्याचे प्रामाणिकपणे पालन करणे आणि ठराविक काळाने शांत मनाने त्याचा आढावा घेऊन तज्ज्ञांच्या मदतीने त्यात बदल करणे यासाठी **मानसिक स्थैर्य** आवश्यक असते. **ज्याच्याकडे हे स्थैर्य असते त्याचा संपत्ती निर्माण करण्याचा मार्ग सुकर होतो.**



SWS ची भूमिका : मार्गदर्शकाची !

या एकतीस वर्षांत आम्ही एक महत्त्वाची गोष्ट शिकलो — ग्राहकांना सर्वाधिक गरज असते ती बाजारातील चढउतारांच्या बाबतीतील अपडेट्सपेक्षा ते सामावून घेऊन योग्य दिशा दाखवणाऱ्या सल्ल्याची. म्हणूनच SWS मध्ये आम्ही नेहमीच **प्रॉडक्टपेक्षा प्रक्रियेवर, परताव्यापेक्षा संयत वर्तनावर आणि अल्पकालीन परिणामांपेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांवर भर दिलेला आहे.** आर्थिक सल्लागाराची खरी भूमिका म्हणजे केवळ बाजारातील चढउतार ग्राहकांना समजावणे अशी नसून त्या चढउतारांच्या काळातही योग्य निर्णय घेऊन त्यावर ठाम राहण्याची **मानसिक ताकद देणे** अशी असते.

आगामी काळ अनिश्चित असेल — पण तो संधींनी भरलेलाही असेल. योग्य दृष्टिकोन, वर्तनात्मक शिस्त, सुयोग्य नियोजन आणि भावनांवर नियंत्रण हीच भविष्यासाठी सर्वात मोठी सुरक्षा आहे.

या प्रवासात आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व ग्राहकांचे, सहकाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे मनःपूर्वक आभार. आपला विश्वास हाच SWS चा खरा पाया आहे.

निष्कर्ष: मानसिक आरोग्य आणि आर्थिक शिस्त यांचा अतूट संबंध आहे. भीती, लोभ, घाई किंवा तुलना या भावना गुंतवणूकीचे चुकीचे निर्णय घडवू शकतात. मात्र **भावनांवर नियंत्रण, दीर्घकालीन दृष्टीकोन आणि शिस्तबद्ध कृती मनःशांती देतात**. नियोजन केले म्हणून संपत्ती निर्माण होत नाही. ते सातत्याने पाळले तरच आपल्याला अपेक्षित परिणाम दिसतात. नियमित गुंतवणूक आणि संयमित पुनरावलोकन— हीच आर्थिक समृद्धीची गुरुकिल्ली आहे.

शेवटी या वर्धापनदिनानिमित्त एकच संदेश — बाजारावर लक्ष ठेवा, पण आपल्या विचारांवर, वर्तनावर त्याहून अधिक लक्ष ठेवा. कारण दीर्घकालीन आर्थिक यशाचे सूत्र हे आपल्या वर्तनात दडलेले आहे.

Behavioral Finance Quotes

Invest with Logic, Not The Headlines.	Behavior Drives Returns More Than Markets Do.

साइबर सुरक्षा मंत्र

डॉ. रुपाली कुलकर्णी,
प्रशिक्षण, आय.टी. आणि कंटेंट प्रमुख

आज के डिजिटल युग में साइबर फ्रॉड का खतरा तेजी से बढ़ रहा है और यह सिर्फ तकनीकी समस्या नहीं रह गया है — यह हमारी आर्थिक सुरक्षा और मानसिक शांति को भी चुनौती दे रहा है। २०२४ में भारत में लगभग ३६ लाख वित्तीय साइबर फ्रॉड की घटनाएं दर्ज की गईं, जिनके कारण लोगों को लगभग ₹२२ ,८४५ करोड़ का भारी नुकसान हुआ — जो पिछले वर्ष की तुलना में २०६ % तक अधिक था। ऐसे में केवल सतर्क रहना ही नहीं, बल्कि साइबर फ्रॉड जागरूकता, सुरक्षित व्यवहार और जागरूक निर्णय लेना बेहद आवश्यक है। जब हम अपने डिजिटल डेटा, पासवर्ड और लेन-देन की सुरक्षा को प्राथमिकता देते हैं, तभी हम न केवल अपनी संपत्ति की रक्षा करते हैं, बल्कि मानसिक तनाव और घबराहट से भी बचते हैं। **सुरक्षित निवेश और डिजिटल जागरूकता मिलकर हमारी आर्थिक यात्रा को मजबूती और आत्मविश्वास प्रदान करते हैं। स्मार्ट निवेशक वही, जो डिजिटल रूप से भी सजग हो।** आइए, साइबर जागरूकता की एक काव्यमय यात्रा पर चलें।

साइबर सुरक्षा मंत्र

साइबर फ्रॉड्स की बढ़ रही है मात्रा,
सावधानी न बरतो , तो धन को है खतरा
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा !!

मोबाइल पे आये हुए, ट्रांजैक्शन OTP,
आपकी वित्तीय सुरक्षा के है उपयोगी,
अगर साइबर फ्रॉड् में धन नहीं है गंवाना,
तो अज्ञात व्यक्तिसे, OTP साझा न करना,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || १ ||

अज्ञात हायपर लिंक से, रखो हमेशा दूरी,
क्लिक उसे ना करना , जब जानकारी ना हो पूरी,
ऐसी लिंक ले के जाये ,किसी फेक वेबसाइटपर,
जहाँ साइबर क्रिमिनल, धन जाए लूटकर,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || २ ||

फ्री वाय फाय से, तो हमेशा है बचना,
वित्तीय व्यवहार के लिए, इसे इस्तेमाल न करना,
आपकी वित्तीय जानकारी पर, कोई रख सकता है नजर,
धन लापता हो सकता है, आप को बिना खबर,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ३ ||

स्ट्रॉन्ग बैंकिंग पासवर्ड्स का इस्तेमाल है करना ,
और समय समय पर, उसे भी है बदलना,
टू फैक्टर ऑथेन्टिकेशन , इस्तेमाल मे है लाना,
नहीं तो पड सकता है , निजी धन को खोना ,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ४ ||

सोशल मिडिया के, कोई भी वीडियो,
देख सुन कर तुम निवेश ना करियो,
किसी भी इन्फ्लुएंसर के लालच में मत आना,
अज्ञात संस्था में, निवेश कभी न करना
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ५ ||

"डिजिटल अरेस्ट" का अब नया जाल,
धोखाधड़ी की पुलिस, करती है सवाल,
बातों से डराकर मांगते है धन,
जाल में ना फँसें , कॉल बंद करें तुरंत,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ६ ||

फेक कॉल, ईमेल से रहना दूर,
सावधानता और उचित ज्ञान रखो भरपूर,
अंजान लिंक्स, अंजान कॉल्स को रखना है दूर,
सायबर लूट के तरिके, जानो ये जरूर,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ७ ||

सोशल मीडिया से, शेअर ट्रेडिंग ऐप्स जो आते,
फेक ऐप्स डाउनलोड कर, लोग हे पछताते,
ऐसे धन को व्यर्थ कभी न गँवाओ,
सोच-समझकर ही निवेश अपनाओ,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ८ ||

अंजान प्लेटफॉर्म पे, मत करो निवेश,
सायबर क्रिमिनल्स रखेंगे ना धन को शेष,
सोचोंगे मिलेंगे अच्छे रिटर्न ,
पर नुकसान से व्याकुल होगा मन,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || ९ ||

राष्ट्रीय साइबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल,
आपकी मदद के लिए, उपलब्ध हर पल,
साइबर क्राइम से, कभी पीड़ित हो आप अगर,
तब 1930 ये हे हेल्पलाइन का नंबर,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना है अलविदा || १० ||

लोकल पुलिस थाना और संस्था शिकायत अधिकारी,
दे सकते हैं आपको सही जानकारी,
तो कभी अनुभव हो, साइबर फ्रॉड का,
यहासे मदत लेना, हैं उचित तरीका,
साइबर सुरक्षा मंत्र ये, ध्यान में रखे सर्वदा,
अगर साइबर फ्रॉड्स को, करना हैअलविदा || ११ ||

Behavioral Finance Quotes

Don't' Forget .. Emotions Are Temporary Goals are Not.

Invest With A Plan, Not With A Prediction.

आमच्या बद्दल थोडेसे...

आमचा प्रवास: आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने संस्थेचा प्रवास सुरु झाला. सोपी, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्वासाहार्य सेवा ही आमची वैशिष्ट्ये असून आज संस्था व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जात आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

SWS मध्ये आम्ही तुमचे आर्थिक नियोजन तयार करतो. स्पष्ट कालमर्यादित, आर्थिक ध्येये निश्चित करून तुमचा आर्थिक प्रवास सुबद्ध ठेवतो. तुमच्या गरजा समजावून घेऊन त्यानुसार योग्य आर्थिक पोर्टफोलिओ उभारतो आणि त्याच्या सातत्यपूर्ण वाढीवर भर देतो. शास्त्रशुद्ध विचार आणि साधेपणा यांची सांगड घालून आम्ही तुमच्या गुंतवणुकीला आत्मविश्वासाने आणि रणनीतीपूर्वक जोपासतो.

आमच्या सेवा:

- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर (जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.) आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा: म्युच्यअल फंड्स, इक्विटी मार्केट, कॉर्पोरेट फिक्सड डिपॉसिट्स इ. च्या माध्यमातून
- जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- करनियोजन आणि कर्ज सेवा
- व्यवसाय किंवा इतर विशिष्ट हेतू संदर्भात आर्थिक गुंतवणूक सल्ला, सेवा

आमची वैशिट्ये:

- ३१ वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव, AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक
- CFA, CFP सारखी प्रमाणित शैक्षणिक पातळी आणि इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सीसारखी पार्श्वभूमी असणारी अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- विश्वासार्ह आणि निःपक्षपाती सल्ला, सोपा, ग्राहकाभिमुख, पारदर्शी, नैतिक व्यवहार
- वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- पुणे, मुंबई, नागपूर, वर्धा आणि इतर उदोयन्मुख शाखा

व्यावसायिक उत्कृष्टते बरोबरच SWS संस्थेतील प्रत्येकजण आपले सामाजिक भान जपतो! संस्थेच्या सर्व समाजोपयोगी कार्याला अधिक संघटितरित्या आणि परिणामकारक स्वरूपात पुढे न्यावे हा विचार करून, २०१८ मध्ये 'अल्पारंभा एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन' चा उदय झाला. समाजावर प्राथमिक परिणाम करणारी, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्र ही प्रामुख्याने विचारात घेतली गेली. या दोन्ही विषयांच्या कक्षेत कार्य करतांना, त्यातील विविध निकडी ओळखून, त्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणे आणि समाजामध्ये अर्थ साक्षरता वाढावी यासाठी कार्य करणे ही अल्पारंभाची प्राथमिक उद्दिष्ट्ये आहेत. अधिक माहिती alprambha.com आणि सामाजिक, ललित, काव्य या विषयांवर आधारित ब्लॉग: alprambha.blog येथे उपलब्ध आहे.

॥ अल्पारंभः क्षेमकरः ॥
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक: ARN- ९०७४६
मुख्य कार्यालय: दुसरा मजला, मंडलिक प्राईड, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक १३.
संपर्क: श्री. विक्रांत राठोड: ०२५३-२ ९७५ ९७५ / ७५०७८ ८४४७७
www.swsfspl.com https://swsfspl.blog

पुणे
श्री. स्वप्नील एकांडे
कार्यालय क्रमांक २६, दुसरा मजला,
द प्लॅटिनम टॉवर्स, बॉलीवूड थिएटरजवळ,
तुकाराम नगर, खराडी, पुणे, ४११०१४
संपर्क: ९८२८७३५०५५ / ७७२००९९२४१
swapnil@swsfspl.com

मुंबई
श्री. किशोर काळे
दुकान क्रमांक 6, दौलत मिनार सीएचएस लि.,
समोर. ठक्कर बेकर्स, शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७
संपर्क: ९८६९२३९९४० / ९२२४४३३१२२
kishor@swsfspl.com

नागपूर
श्री नीरज अडबे
फ्लॅट F1, पहिला मजला, योगेश
कॉम्प्लेक्स, ढोमणे ज्वेलर्स समोर, प्रताप
नगर स्क्वेअर, नागपूर -४४००२२
संपर्क: ८३०८८३३७२४
neeraj@swsfspl.com